दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com


आजचे दिवेच रूप : स्कंदमाता

आजचा रंग भगवा



वर्ष : ०५ | अंक : ४३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.२७ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# कर्जमुक्ती सरसकट द्या, अश्रू पुसा; पंतप्रधान मोदी यांना मराठवाड्यात येण्याचे आवाहन

**अक्षराज : अशोक कुलकर्णी**

**दि.२६, कळंब** : राज्य सरकारने शेतकऱ्यांना सरसकट मदत करून कर्जमुक्ती करावी, शेतकऱ्यांनी खचून न जाता आत्महत्या करू नये असे वचन उद्धव ठाकरे यांनी शेतकरी यांच्याकडून घेतले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आता खरा मराठवाड्याचा दौरा केला पाहिजे. ते जे उत्सव करीत आहेत ना त्यापेक्षा त्यांनी मराठवाडा येथे यावे, इथे काय आक्रोश सुरु आहे हे पाहावे. पंतप्रधान यांना मी आमंत्रण देतो की त्यांनी मराठवाड्यात यावे व शेतकऱ्यांचे आश्रू पुसावे. केंद्रातून भरघोस मदत केंद्र सरकारच्या माध्यमातून करावी असे आवाहन केले.

मी फक्त आता तुम्हाला धीर देऊ शकतो, माझ्या हातात आता काहीही नाही, आत्मविश्वास आहे त्याच्या जोरावर आपण सरकारला झुकवू शकतो. मी कर्जमुक्ती केली पण त्याची जाहिरात केली नाही उपकार केला असे दाखवले नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणतात लाडक्या बहिणींना पैसे देतोयं मात्र ते पैसे देता म्हणजे उपकार करता काय? ते पैसे आजच्या काळात पुरतात का असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला. उद्धव ठाकरे यांनी धाराशिव जिल्ह्यातील पूरस्थितीचा आढावा घेत



पाहणी केली, यावेळी मिलिंद नार्वेकर, अंबादास दानवे, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील, प्रवीण स्वामी उपस्थितीत होते.

मला शेतीतल कळतं नाही असे म्हणतात व टीका करतात, मी शेतकऱ्यांना विचारतो, जी शेतजमीन खरडून गेली आहे ती नीट करायला ५ वर्ष लागतात म्हणजे शेतकऱ्यांच्या आयुष्यातील ५ वर्ष गेली. त पर्यंत शेतकरी यांच्या डोक्यावरील कज कोण फेडणार? त्यांच्या मुलांची शिक्षण कोण करणार? पुस्तकं दप्तरं वाहून गेले घरात पाणी शिरल्याने शेतकऱ्याचे आयुष्य वाहून गेले आहे ते कसे उभे राहणार? सरसकट कर्जमाफी या सरकारकडुन करून घेणार, आजच सरकारला मी सांगतो की रस्त्यावर उतरायची वेळ आली तर मी स्वतः मराठवाड्यातील शेतकऱ्यासोबत रस्त्यावर उतरेल व कर्जमाफी करून घेईल. बँका आता कर्जमाफीच्या नोटीस पाठवत असुन शेतकऱ्यांनी त्या नोटीसा शिवसेना शाखेत जमा करा त्या मुख्यमंत्री यांना पाठवू. मी शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावुन रस्त्यावर उतरून शेतकऱ्यांसाठी लढा देईल असे ठाकरे म्हणाले. शेतकऱ्यांना काहीच मदत मिळत नाही एकरी ३,४०० रुपये मदत कमी असुन त्यातून काहीच होत नाही. शेती काढून पुन्हा नीट करायला जास्त पैसे लागतात. एकरी ५० हजार मदत करणे गरजेचे असुन ती सरकारने करावी अशी मागणी ठाकरे यांनी केली. आत्महत्याचा विचार करायचा नाही, खचून जाऊ नका असे वचन त्यांनी शेतकरी यांच्याकडुन घेतले, ज्याच्या मनात आत्महत्या विचार येईल त्याला धीर द्या.

## ठाण्यात राज्यातील पहिले 'सायबर वेलनेस सेंटर' सुरू

**अक्षराज : भानुदास गायकवाड**



**दि.२५, ठाणे** : सायबर गुन्ह्यांचे वाढते प्रमाण लक्षात घेऊन ठाणे पोलीस आयुक्तालयाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. राज्यातील पहिले सायबर वेलनेस सेंटर ठाण्यात सुरू करण्यात आले असून याचे उद्घाटन मा. पोलीस आयुक्त श्री. अशुतोष डुंबरे यांच्या हस्ते झाले.गेल्या काही वर्षांत ऑनलाइन फसवणुकींच्या घटनांमध्ये प्रचंड वाढ झाली असून, अनेक बळी पडलेल्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे पोलीस आयुक्तालयात आधीच प्रत्येक पोलीस ठाण्यात स्वतंत्र सायबर कक्ष तसेच दोन तज्ज्ञांची नेमणूक करण्यात आली आहे. त्याचबरोबर क्रिप्टोकरन्सीमार्फत होणाऱ्या फसवणुकींचा तपास करण्यासाठी मक्रिप्टोकरन्सी अन्वेषण कक्षफ नुकताच सुरू करण्यात आला आहे.यानंतर आता प्रथमच सायबर वेलनेस सेंटर सुरू झाले असून, या केंद्रातून सायबर गुन्ह्यात बळी पडलेल्या पीडितांना मानसिक आधार, तांत्रिक मार्गदर्शन आणि कायदेशीर समुपदेशन दिले जाणार आहे. तसेच शाळा आणि महाविद्यालयांमध्ये सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमही राबविण्यात येणार आहे.या कार्यक्रमास मा. पोलीस आयुक्त अशुतोष डुंबरे, पोलीस सह आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) पंजाबराव उगले, पोलीस उप आयुक्त श्रीकांत परोपकारी, पराग मणेरे, रिस्पॉन्सीबल नेटीझम संस्थेच्या उएज सोनाली पाटणकर, उजज उन्मेश जोशी, सुप्रसिद्ध दिग्दर्शक अभिजीत पानसे, विजू माने तसेच ठाणे जनता सहकारी बँकेचे पदाधिकारी उपस्थित होते.सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या सावटात ठाणे पोलिसांचे हे पाऊल राज्यातील इतर शहरांसाठीही आदर्श ठरणार, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा सुरळीत सुरु

**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२६, मुंबई** : दरवर्षी प्रमाणे शालेय विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा अर्थात एलीमेन्ट्री आणि इन्टरमीजिट परीक्षा गेल्या २४ तारखेपासून वरळी येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर मनपा शाळेत सूरळीतपणे सुरु असून या परीक्षेसाठी विभागातील विविध शाळाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा आणि त्यांचे व त्यांच्या कलेचे मूल्यमापन व्हावं आणि कला क्षेत्रात प्रमाणित व दर्जेदार आर्टिस्ट तयार व्हावेत या उद्देशाने राज्य शासनाच्या वतीने प्राथमिक स्तरावर एलीमेन्ट्री आणि इंटर मिजीएट या दोन्हीही परीक्षा घेतल्या जातात.बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या जी /दक्षिण विभागातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंग्रजी शाळेत ही परीक्षा गेल्या दोन दिवसांपासून सुरळीत पणे सुरु असल्याचे दिसून आले. चित्रकला शिक्षक आकाशानंद हिरवे यांच्या प्रमुख व उत्तम नियोजनात या परीक्षा संपन्न होतं असून इमारत प्रमुख सुजाता तडवी या केंद्रप्रमुख म्हणून काम पाहत आहेत.या परीक्षा केंद्राला जी/ दक्षिण विभागाच्या प्रशासकीय अधिकारी वर्षा गांगुर्डे यांनीही भेट दिली असून परीक्षा केंद्राच्या व्यवस्थापणा बाबत समाधान व्यक्त आहे.या परीक्षा केंद्रावर वरळी विभागातील एकूण २४९ विद्यार्थी परीक्षेला बसले असून यापैकी १५२ विद्यार्थी एलीमेन्ट्री परीक्षेला तर ९७ विद्यार्थी इंटरमिजिएट परीक्षेला बसले आहेत. परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी चित्रकला शिक्षक संदीप भिवसाने,पूनम वाघमोडे,मनीषा लोहार,आणि नीलम काजरोळकर या विशेष मेहनत घेत आहेत.

## चनई येथे सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्धाटन! आ. नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नांना आले यश




**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२५, अंबेजोगाई (बीड)** : आज चनई येथे प्रधानमंत्री कुसुम मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२ अंतर्गत ८ मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे उद्घाटन पंतप्रधान मा.श्री.नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने पार पडले यावेळी मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्र फडणवीस हे देखील ऑनलाइन माध्यमातून कार्यक्रमाला उपस्थित होते. आमदार नमिता मुंदडा यांच्या प्रयत्नातून हा सौर ऊर्जा प्रकल्प साकारण्यात आला आहे. या सौर ऊर्जा प्रकल्पामुळे लोखंडी सावरगाव उपकेंद्र व यस.आर.टि. दवाखाना उपकेंद्र यांना प्रत्येकी चार मेगावॅट इतका दिवसाला वीज पुरवठा उपलब्ध होणार आहे.यावेळी कार्यक्रमाला उपस्थित भाजपचे जेष्ठ नेते नंदकिशोरजी मुंदडा, महावितरण चे अ.अभियंता रजपूत, का. अभियंता, स.अभियंता, उप.अभियंता,क.अभियंता, महावितरण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी तसेच शेतकरी बांधवांसह इतर मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे संपूर्ण जगभरातील देशांपुढे समस्या : सुपनेकर

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२५, पाटण** : पृथ्वीच्या वाढत्या तापमानामुळे संपूर्ण जगभरातील देशांपुढे आज समस्या निर्माण झाली आहे. वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीच्या वातावरणामध्ये खूप मोठे बदल घडून येत आहेत. अतिनील किरणांमुळे पृथ्वीवरील सजीवांवर हानिकारक परिणाम होत आहेत यामधून जर आपणास सुटका हवी असेल तर पृथ्वी हरित करणे तसेच ओझोन थराचे संरक्षण करणे ही काळाची गरज बनली आहे तसेच ओझोन वाचवा पर्यावरण वाचवा असे मत संख्याशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस.आर. सुपनेकर यांनी व्यक्त केले. ते बी.डी. कॉलेजमध्ये ओझोन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कोयना एज्युकेशन सोसायटीचे बी.डी. कॉलेज, पाटण भूगोलशास्त्र विभाग व निसर्गप्रेमी मंडळ, आय.क्यू.ए.सी. यांच्यातर्फे ओझोन दिवस निमित्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संख्याशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस.आर. सुपनेकर तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार तर प्रमुख उपस्थिती म्हणून भूगोलशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीप तडाखे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. हेमलता काटे, , प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डी. डी. थोरात यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. डी. डी. थोरात यांनी निसर्गप्रेमी मंडळ याबाबत थोडक्यात माहिती सांगितली. त्यानंतर डॉ. संदीप तडाखे यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले कार्यक्रमाचा उद्देश व निसर्ग प्रेम मंडळ मार्फत घेण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांविषयी माहिती दिली तसेच घेण्यात आलेल्या पर्यावरण रील स्पर्धेची निकष सांगितले. त्यानंतर ओझोन दिनानिमित्त घेण्यात आलेल्या रील्स स्पर्धेमधील काही निवडक रील्स विद्यार्थ्यांना दाखविण्यात आल्या तसेच स्पर्धेमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देवून सत्कार करण्यात आला. नंतर प्रमुख पाहुणे एस.आर. सुपनेकर यांनी ओझोन थर याचे महत्व सांगितले. सूर्यापासून निघणारी अतिनील किरणे माणसामध्ये व इतर प्राण्यामध्ये विविध आजार उत्पन्न करू शकतात. आपल्या पृथ्वीवरील सजीवसृष्टीला सुरक्षित ठेवण्यात ओझोन थराचा मोठा वाटा आहे. त्याचबरोबर त्यानी मॉन्ट्रियल करार याबद्दल माहिती सांगितली निसर्ग सोंदर्य तसेच सजीवसृष्टी जर वाचवायची असेल तर झाडे नुसती लावून चालणार नाही तर ती जगवली पाहिजेत, वाढवली पाहिजेत, प्रदूषण कमी केले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. एच.व्ही. काटे म्हणाल्या की, पर्यावरण रक्षण हे आपना सर्वांचे प्रथम काम आहे. ओझोन थराच्या महत्त्वाविषयी आणि त्याच्या संरक्षणाबद्दल जनजागृती करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. संतोष पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.तसेच सूत्रसंचालन प्रा.गंगाराम चव्हाण यांनी केले.यावेळी प्रा. डॉ. भरत जाधव, प्रा. प्रदीप गायकवाड, प्रा. श्रीगणेश गायकवाड यांच्यासह बी.ए. व बी.कॉमचे विद्यार्थी उपस्थित होते.

## गुहागर तालुक्यात भातपिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२६, निवोशी (गुहागर)** : रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात निवोशी, पालशेत, अडूर, बुधल, मळण, पोमेंडी, वरवेली सह समुद्र नजीक असणाऱ्या गावांत बदलते हवामान आणि सततच्या पावसामुळे नागली व भात भातशेतीवर करपा या बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव वाढला असून मौजे निवोशी गावात पिके पूर्णतः कुजून गेलेली आहेत,तालुक्यात बहुतांश ठिकाणी अशीच परिस्थिती पाहायला मिळत आहे.त्यामुळे हवालदिल झाले आहेत,काही ठिकाणी शेतामध्ये पाणी साचल्याने शेतीची नासधूस झाली आहे.शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार,पाणी



साचल्याने रोपांची वाढ खुंटली आहे.तर मोठ्या प्रमाणावर शेती कुजली आहे, पिकांवर मोठ्या प्रमाणावर कीड पडल्याचे पाहायला मिळते, करपा रोगाने थैमान घातल्याने धान्य उत्पादन घटण्याची शक्यता आहे.यामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठी निराशा पसरली आहे.भात रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्पांतर्गत संबंधित विभागीय अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाणे आवश्यक शेतकऱ्यांचे मनोबल वाढावे यासाठी शासनाच्या तालुका कृषी विभागाने भात रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्पांतर्गत संबंधित विभागीय अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतीची पाहणी करून शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळावी यासाठी प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया सुरू करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा.अशा स्थितीत रोगराईमुळे झालेल्या नुकसानीतून उभे राहण्यासाठी कष्टकरी शेतकऱ्यांना शासकीय मदतच एकमेव आधार ठरेल.

## संपादकीय



### कोठारी आयोगाची भूमिका: समाजवास्तवाचे भान

कोठारी आयोगाने १९६४ साली भारतीय समाजवास्तव, शिक्षणातील त्रुटी आणि भविष्यातील दिशा यांचा सखोल अभ्यास केला. आयोगाने मूलभूत प्रश्नांचा शिक्षणाशी थेट संबंध जोडून क्रांतिकारी शिक्षण व्यवस्थेची आवश्यकता अधोरेखित केली. कोठारी आयोगाचा दिर्घ अहवाल दोन भागात विभागता येतो. पहिल्या भागात १९६४ चे भारताचे समाजवास्तव व शिक्षण स्थिती आणि दुसऱ्या भागात शिक्षणाची सैध्दांतिक भूमिका स्पष्ट केली आहे. २ ऑक्टोबर १९६४ला आयोगाने आपल्या कामाची सुरुवात केली. १२ कार्यगट तयार करून १०० दिवस केंद्रशासित व राज्यशासित क्षेत्राचा अभ्यास समितीने केला. प्राथमिक शिक्षण, उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण, शेती शिक्षण, प्रौढ शिक्षण, विज्ञान शिक्षण आणि संशोधन, शिक्षक प्रशिक्षण आणि स्तर, विद्यार्थी कल्याण, नविन तंत्र व पध्दती, लोकशक्ती, प्रशासकिय शिक्षण विभाग, आर्थिक तरतुद या १२ गटांमध्ये अभ्यास करण्यात आला. या १२ गटांमध्ये पुढील विषयावर अभ्यास केंद्रित करण्यात आला होता. स्त्री शिक्षण, मागासवर्गीयांचे शिक्षण, शाळा इमारती, (भौतिक सुविधा) शाळेचे सामाजिक संबंध, आकडेवारी, (सांख्यिकी) पुर्व प्राथमिक शिक्षण आणि शालेय पाठ्यक्रम या विषयाचा अभ्यास आयोगाने केला. भारतातील ९००० लोक, विविध सामाजिक घटक व संघटना, शाळा, महाविद्यालये, उद्योग क्षेत्र, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय शिक्षण अभ्यासक, स्त्रिया, विद्यार्थी शिक्षक, विविध क्षेत्रातील अभ्यासक अशा विविध घटकांशी आयोगाने चर्चा केली. व्यापक व महत्त्वाच्या घटकांचा अभ्यास कोठारी आयोगाने केला. आयोगाच्या अभ्यासाची व्याप्ती आणि दिशा लक्षात घेण्यासारखी आहे. शिक्षण ही सामाजिक, भौतिक, राजकीय कृती असते. समाजवास्तव लक्षात घेऊनच त्यात भरीव बदल होऊ शकतात याचे भान आयोगाला होते, हे त्यांच्या अभ्यासाच्या विषयातून स्पष्ट होते. या अभ्यासाचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे केवळ वास्तव अधोरेखित केले नाही, तर ते सोडवण्याची भूमिका घेतली. भारताचे वास्तव त्यांनी पुढीलप्रमाणे अधोरेखित केले. अन्न-धान्याचा तुटवडा, आर्थिक व बेरोजगारीचे प्रश्न, सामाजिक आणि राष्ट्रीय एकता आणि राजकिय चेतना हे मूख्य आव्हान त्यांनी अधोरेखित केले. या सर्व प्रश्नांचा संबंध शिक्षणाशी जोडला व क्रांतिकारी शिक्षण व्यवस्थेची गरज प्रतिपादली. खाद्यान्य निर्भरतेसाठी शेती शिक्षण: १९६४ची भारताची लोकसंख्या व जन्मदर लक्षात घेता अन्न-धान्याचे उत्पादन पुरेसे होत नव्हते. अन्न-धान्याची गरज भागवण्याचा विषय राजकिय व आर्थिक मानला जातो. हे काही अंशी सत्य आहे. परंतु शिक्षण व्यवस्था त्याकडे दुर्लक्ष करु शकत नाही. कोठारी आयागाने हा विषय शिक्षणाशी जोडला. प्रचलित शिक्षण व्यवस्थेचा शेती शिक्षणाचा व शिक्षितांचा दृष्टिकोन पुढील शब्दात व्यक्त केला. "इस शिक्षा व्यवस्था में कृषि की सर्वाधिक महत्ता प्रतिबिंबित नही होती जिसकी उपेक्षा सभी अवस्थाओं पर की जाती है जिसकी ओर देश की चोटी की प्रतिभाओं का समुचित अंश आकृष्ट नही होता; विश्वविद्यालयों के कृषि संकायो में भरती होणे वालों की संख्या बहुत ही कम है तथा कृषि कॉलेज तुलनात्मक दृष्टि से कमजोर तथा अल्प विकसित है" भारताच्या आर्थिक विकासासाठी शेती उत्पादनात वाढ व शेतीचे आधुनिकीकरण करणे आवश्यक आहे, याकडे आयोगाने लक्ष वेधले. त्यावेळच्या शिक्षण व्यवस्थेचे शेती ज्ञानाकडे दुर्लक्ष व शिक्षितांच्या अनास्थतेतून सामाजिक वास्तव प्रतिबिंबित केले. औपचारिक शिक्षणात उत्पादक ज्ञानाचा अंतर्भाव सोईचा व गरजेपुरता मर्यादित ठेवला गेला. तो मुख्य ज्ञान प्रवाहाचा भाग बनला नाही. दुसरे कारण उच्च जातींना परंपरागत उत्पादन प्रक्रियेत रस नव्हता. भारतातील जाती समाजरचनेनी तयार केलेली धारणा शिक्षण व्यवस्थेत काम करते हे आयोगाने नेमकेपणाने हेरले. आर्थिक विकासाची दरी -१९५०-५१ ते १९६४-६५ या पंधरा वर्षातील राष्ट्रीय उत्पन्न स्थिर असल्याचे कोठारी आयोगाच्या निदर्शनास आले.


# 'गुगल' गुरू चा वाढदिवस!




आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते. अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे.

अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव 'बॅकरब' असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले. गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेंव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो. ७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे. १९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली. जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात. गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल.

**गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!**



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

# ओला दुष्काळ सारखी परिस्थिती असताना केवळ १३०० शेतकऱ्यांचे पंचनामे

## शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्या - विक्रमबाबा पाटणकर




**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि. २६ , पाटण (सातारा) :** पाटण तालुक्यात पावसाळा हंगामाच्या अगोदर एक महिना आधी १५ मे पासून पावसाळा सुरू झाला आहे. मे महिन्यातच अतिवृष्टी सदृश झालेल्या पावसाने पुढील चार महिन्यांतील पाऊसाची चुणूक दाखवली. या पावसामुळे पाटण तालुक्यातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. अंतिम टप्प्यात आलेल्या उन्हाळी पिकांची नासाडी झाली. मे पासून लागून राहिलेल्या पावसाने काही ठिकाणी पेरणी झाली तर काही ठिकाणी पेरण्याच झाल्या नाहीत. अनेक ठिकाणी दुबार पेरणी करावी लागली. जून, जुलै, ऑगस्ट मध्ये सतत लागून राहिलेल्या पावसाने पेरणी झालेल्या पिकांचे नुकसान झाले. ओला दुष्काळ सारखी परिस्थिती असताना पाटण तालुक्यात सरासरी दोन लाख शेतकऱ्यांपैकी केवळ १३०० शेतकऱ्यांचे नुकसानीचे पंचनामे झाले हे दुर्दैव आहे. इत्तर शेतकऱ्यांनी करायचे काय..? असा प्रश्न करुन तालुका प्रशासनाने नुकसान झालेल्या सरसकट शेतकऱ्यांचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत व शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा असे सातारा जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष व पाटण विधानसभा मतदारसंघ भाजपा प्रचार प्रमुख विक्रमबाबा पाटणकर यांनी प्रांताधिकारी सोपान टोम्पे, तहसिलदार अनंत गुरव, तालुका कृषी अधिकारी बांबले यांना सांगितले.

पाटण तालुक्यात अतिवृष्टी सदृश झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे झालेल्या नुकसानी संदर्भात विक्रमबाबा पाटणकर, शेतकरी पंडीतराव मोरे, विष्णू संकपाळ आदी उपस्थित होते. यावेळी विक्रमबाबा पाटणकर यांनी चालू वर्षी पावसाळ्यात शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असताना दोन लाख शेतकऱ्यांपैकी केवळ १३०० शेतकऱ्यांचे पंचनामे झाले यावर आश्चर्य व्यक्त केले. याबाबत तालुका प्रशासनाला त्यांनी जाब विचारला तालुक्यात फक्त १३०० च शेतकरी आहेत का. तालुक्यातील चालू वर्षी झालेल्या पावसाचे प्रमाण पाहिले तर सरासरी चार हजार मिली मीटर ते सहा हजार मि. मी पर्यंत झाले आहे. अनेक वेळेला चौवीस तासात चारशे ते पाचशे मि.मी पाऊस झाल्याची नोंद आहे. यामुळे अनेक वेळेला पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. यात तालुक्यातील ८० ते ८५ टक्के शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत सरासरी दोन लाख शेतकऱ्यांपैकी केवळ १३०० शेतकऱ्यांचे पंचनामे होतात हे योग्य आहे का..? मे महिन्यात झालेल्या १३०० शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे तेच पंचनामे अजून प्रशासन दाखवत आहे. जून, जुलै, ऑगस्ट मध्ये झालेल्या नुकसानीचे काय..? ओला दुष्काळ सारखी परिस्थिती असताना केवळ १३०० शेतकऱ्यांचे पंचनामे दाखवून तालुका प्रशासन शेतकऱ्यांची फसवणूक करत आहे. हे योग्य नाही. अतिवृष्टी सदृश झालेल्या पावसाने काही ठिकाणी पेरणी झाली तर काही ठिकाणी पेरण्याच झाल्या नाहीत. अनेक ठिकाणी दुबार पेरणी करावी लागली. अनेक ठिकाणी पेरलेले बियाणे उघवलेच नाही. या बाबी पंचनाम्यात प्रशासनाने घेतल्याच नाहीत. यांच्या नजरेत नुकसान म्हणजे उगवून आलेले पिकाचे नुकसान म्हणजे शेतकऱ्यांचे नुकसान एवढंच आहे. तर असं न करता प्रशासनाने अति पावसामुळे शेतकऱ्यांचे कोणत्या बाबींमुळे नुकसान झाले याचा अहवाल शासनाला पाठवला पाहिजे. आणि शेतकऱ्यांना मदत मिळविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. प्रशासनाकडून शेतकऱ्यांना मदत मिळविण्यासाठी प्रयत्न होत नसतील तर याबाबत आपण स्वतः मुख्यमंत्र्यांना भेटणार असल्याचे विक्रमबाबा पाटणकर यांनी सांगितले.

# सरकारशी वाद घालू पण मदत मिळवून देऊ खा.बजरंग सोनवणे यांनी शेतकऱ्यांना दिला शब्द

## केज, धारूर, परळी तालुक्यात अतिवृष्टीग्रस्तांची घेतल्या भेटी

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२६, बीड :** बीड जिल्ह्यात अतिवृष्टी झाली. नद्यांना इतका मोठा महापूर आला की, जमीनी वाहून गेल्या. पिकात अजून पाणीच आहे. यामुळे शेतकरी कोलमडून गेला आहे. आर्थीक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना सरकारने भरीव मदत करावी, तसे न केल्यास आपण सरकारला शेतकऱ्यांसाठी कोणत्याही पातळीवर भांडू, असा शब्द खा.बजरंग सोनवणे यांनी अतिवृष्टीग्रस्तांना दिला.

तीन दिवसांपासून खा.बजरंग सोनवणे अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी करत आहेत. केज, बीड, शिरूर मतदारसंघात दोन दिवस पाहणी केल्यानंतर दि.२५ सप्टेंबर रोजी केज तालुक्यातील दैठणा, राजेगाव, धारूर तालुक्यातील फकीर जवळा, परळीतील सिरसाळा, गोवर्धन, हिवरा, जलगव्हाण, पोहनेर, तेलसमुख, बोरखेड, ममदापूर, कौडगाव या गावातील अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीची पाहणी केली. यावेळी पुढे बोलताना खा.बजरंग सोनवणे म्हणाले, दहा दिवसांपासून जिल्ह्यात अतिवृष्टी होत आहे. आधी आष्टी तालुक्यात अतिवृष्टी झाली. त्याठिकाणी मी तातडीने जावून संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांची विचारपूस केली, धीर दिला. यानंतर मागील चार दिवसांपुर्वी जिल्हाभरात सर्वत्रच अतिवृष्टी झाली. जिल्हा मोठा आहे, मी सकाळी सहा वाजता घर सोडून शेतकऱ्यांना भेटण्यासाठी जात आहे. अतिवृष्टीने प्रचंड नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरची चिंता बघवत नाही. पण शेतकऱ्यांनी खचून जावू नये, सरकारकडून मदत मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत. यासाठी वेळप्रसंगी आम्ही सरकारशी भांडू, पण तुम्हाला मदत मिळवून देण्याचा प्रमाणिक प्रयत्न करत आहोत. जिल्ह्यात नदीकाठी असलेल्या गावात पाणी शिरलेले आहे. शेतातील पिके, जमीन, विहीरी शेतकऱ्यांच्या डोळ्यादेखत वाहून गेल्या. कधी नव्हे इतके पाणी नागरिकांनी पाहिले. जिल्ह्यात जवळपास साडेतीनशे कोटींचे शासकिय मालमत्तेचे नुकसान झालेले आहे. शेतकऱ्यांचे, व्यापाऱ्यांचे किती नुकसान याचा अजून यंत्रणेकडे आकडा आलेला नाही. हे नुकसान कोटीत असणार आहे. शेतकरी या पावसाने उध्वस्त करण्याचे काम केले आहे. सरकारकडून भेटी सुरू आहेत, परंतु अजून ठोस पावले सरकारने उचलले नाहीत. जर ते ठोस पावले उचलत नसतील तर शेतकरी पुढे येवून सरकारविरूध्द उभा राहतील. आम्ही अतिवृष्टीग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी कुठेही कमी पडणार नाहीत, असेही खा.बजरंग सोनवणे म्हणाले, यावेळी त्यांच्या सोबत राष्ट्रवादीचे नेते राजेसाहेब देशमूख आणि राष्ट्रवादीचे पदाधिकारी उपस्थित होते.

### षष्ठरूप

षष्ठरूप कात्यायनी
मनोभावे उपासना
विशुद्ध निर्मळ मना
नकोअसुरी वासना

उग्र करारी रुप तव
शोभादेई सिंहासना
शप्तसति मंत्रोच्चार
स्थीर करिते श्वसना

आज्ञा चक्रा चकित
होई साधक वंदना
उगाळा खोड गोड
सुवास दिला चंदना

आप पर भाव नको
करता माता साधना
सारे मातेची लेकरे
नर नारी हा भेद ना

चतुर्भुजा कमलनेत्री
तल्लीन व्हावे चरणा
कात्यायन ऋषिपुत्री
आलोयं तव शरणा

बदलून पाहू जरासे
नवरात्रीच्या यासणा
माता पावते सगुणा
तिलांजली दे दुर्गुणा

**- हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

## परभणी जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून एकरी ५० हजार रुपये द्या - रत्नाकर शिंदे



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**
**दि.२५ पालम (परभणी) :** मागील काही दिवसापासून जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांची शेती पूर्णतः पाण्यामध्ये वाहून गेलेली आहे. त्यामुळे शेतकऱ्याला पेरणीसाठी केलेला खर्च सुद्धा निघणे मुश्किल झाले, ही परिस्थिती पाहता शासनाच्या वतीने परभणी जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीचा विचार करून जिल्हा ओला दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून घोषित करावा त्याचबरोबर प्रत्येक शेतकऱ्याला एकरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई देण्यात यावी यासह विविध मागण्यांचे निवेदन उपमुख्यमंत्री अजितदादा पवार याना रत्नाकर शिंदे यांनी दिले.यावेळी रत्नाकर शिंदे, आमदार राजेश दादा विटेकर ,आमदार रत्नाकर गुट्टे, ताडकळस कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती बालाजी रुद्रवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## महाबळेश्वर पंचायत समिती येथे स्वच्छता ही सेवा उपक्रम मोहिम




**अक्षराज : रियाज मुजावर**
**दि.२६, महाबळेश्वर (सातारा) :** दि.२६/९/२०२५ रोजी गट विकास अधिकारी श्री विभूती यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व कर्मचारी अधिकारी यांच्या सहकाऱ्यांनी महाबळेश्वर पंचायत समिती येथे स्वच्छता हि सेवा उपक्रम मोहीम राबवण्यात सर्व कर्मचारी अधिकारी यांच्या सहकार्याने स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या स्वच्छता मोहीम साठी उपस्थित कर्मचारी श्री विशाल घाडगे स्वच्छता, विभाग रमेश शिंदे स्वच्छता विभाग, महेश भुरे अर्थ विभाग, ज्योती गाढवे अर्थ विभाग, शशिकांत जी कांबळे प्रशासक विभाग, प्रभाकर शिंदे प्रशासन विभाग असे विविध क्षेत्रातले सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## बारडमध्ये स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**
**दि.२६, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यातील बारड ग्रामीण रुग्णालयात स्वस्थ्य नारी सशक्त परिवार या अभियानाअंतर्गत भव्य महाआरोग्य शिबिराचे दि. २७ रोज शनिवारी आयोजन करण्यात आले असून या शिबिराचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक अभिजीत देशमुख यांनी केली आहे. केंद्र व राज्य शासन तसेच आरोग्य विभागाच्या संयुक्त विद्यमानाने जिल्ह्यात स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान दि.१७ सप्टेंबर ते दि २ ऑक्टोबर पर्यंत राबविण्यात येणार आहे. या आरोग्य शिबिराचे उद्धाटन भोकर विधानसभा आमदार श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. यावेळी तहसीलदार आनंद देऊळगावकर, भाजप जिल्हा महामंत्री बाळासाहेब देशमुख सरपंच मंगला बुरुडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या अभियानात रक्तदान शिबिर, मधुमेह, रक्तदाब, नेत्ररोग, गर्भाशय रोग, मुख कर्करोग रुग्णांची मोफत तपासणी केली जाणार असून रुग्णांना औषधी वाटपही केली जाणार आहे. या शिबिरांत तज्ज्ञ डॉक्टरांकडून रुग्णांची तपासणी केली जाणार आहे.

## विंग गावात महास्वच्छता अभियान



**अक्षराज : सुहास महांगरे**
**दि.२५, विंग (सातारा) :** स्वच्छ भारत मिशन अंतर्गत संपूर्ण सातारा जिल्हा स्वच्छता अभियान करण्याचे आवाहन सातारा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यशनी नागराजन यांनी केले होते त्याला प्रतिसाद देत रामेश्वर विद्यालय येथील विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच सर्व सदस्य ग्रामपंचायत अधिकारी, सर्व शासकीय कर्मचारी, बचत गट,ग्रामपंचायत कर्मचारी, यांनी विंग गावात प्रभात फेरी काढून शाळा आरोग्य उपकेंद्र बाजार मैदान मंदिर परिसर गावातील सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता करून गाव स्वच्छ ठेवण्याचे प्लास्टिक मुक्त करण्याचा संकल्प गावकऱ्यांनी यावेळेस केला त्याला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. येथून पुढे गाव स्वच्छ सुंदर राहील या साठी सदैव प्रयत्न केले जातील.सदर कार्यक्रमाला ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच सर्व सदस्य ग्रामपंचायत अधिकारी, सर्व शासकीय कर्मचारी, बचत गट,ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामस्थ शाळेतील विद्यार्थी व त्याचे शिक्षक, तरुण वर्ग उपस्थित होते.

# गोदावरी बॅक वॉटरचा सात गावांना फटका

## शिवार जलमय, खासदार थेट बांधावर...



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**
**दि.२६, मुदखेड (नांदेड) :** गोदावरी नदी पात्राचे महापुराचे पाणी मुदखेड तालुक्यातील सात गावात शिरल्याने बॅक वॉटर पाण्यामुळे १००० हेक्टर शिवार जलमय झाले असून खासदार रवींद्र चव्हाण, राज्यसभा खासदार अशोक चव्हाण, आ. श्रीजया चव्हाण थेट बांधावर पोहोचून नुकसान भरपाई संदर्भात महसूल प्रशासनास तातडीने नुकसान भरपाई चा अहवाल पाठविण्याच्या सूचना दिल्या. यामुळे शेतकऱ्यांचे बागायती तसेच खरीप पिके महापुरात अडकल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

मुदखेड तालुक्यातील वसंतवाडी, रोहीपिंपळगाव, माळकौठा, देवापुर, कामळज, चिलपिंपरी, महाटी, टाकळी, खांबाळा, दरेगाव या दहा गावात गोदावरी नदीच्या पात्रातील बॅक वॉटर चे पाणी शिवारात घुसल्याने हजारो हेक्टर जमिन पाण्याखाली आली. याशिवारातील बागायती तसेच खरीप पिके पूर्णपणे पाण्यात बुडाल्याने तळहाताच्या खोडाप्रमाणे पोसलेले पीक हातचे गेल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू कोण पुसणार असा संतप्त सवाल आता शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधींसह प्रशासनाला केला आहे. गेल्या पाच ते सहा वर्षांपासून गोदावरी पत्रातील बॅक वॉटर मुळे वसंतवाडी येथील शेकडो एकर जमीन पाण्याखाली जात असून सातत्याने नुकसानीचा सामना करावा लागत आहे. याबाबत अनेक वेळा जिल्हा प्रशासन, लोकप्रतिनिधी यांना विनवणी करून बॅक वॉटर खालील क्षेत्राची वेगळी नोंद घेण्यासंदर्भात निवेदन देण्यात आली होती. परंतु याकडे दुर्लक्ष केल्याने पुन्हा आता नैसर्गिक संकटाला तोंड देण्याची वेळ आली आहे.

दहा गावातील हजारो हेक्टर शिवार पाण्याखाली बुडून गेल्याने पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या भागाचा पूर परिस्थितीचा दौरा करण्यासाठी लोकसभा खासदार रवींद्र चव्हाण, राज्यसभा खासदार अशोक चव्हाण, आ श्रीजया चव्हाण, माजी खासदार तुकाराम रेंगे, काँग्रेस कार्याध्यक्ष पप्पू पाटील कोंडेकर, बालाजी चव्हाण, जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष बालाजी गाडे, काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर थेट बांधावर येऊन शेतकऱ्यांशी हितगुज केली आहे. परंतु संतप्त शेतकऱ्यांना डोळ्यातील अश्रू मात्र अनावर झाले होते. आता तरी या लोकप्रतिनिधींना शेतकऱ्यांच्या व्यथा कळणार काय...? हेच पहावे लागणार आहे. यावेळी नायब तहसीलदार मारोती जगताप यांना लोकप्रतिनिधींनी तातडीने नुकसानीचा अहवाल पाठविण्याच्या सूचना दिल्या असल्या तरीही शेतकऱ्यांना मिळणाऱ्या तुटपुंज्या मदतीने भागणार नसून यांच्यासाठी शासनाकडून विशेष पॅकेज घेण्यासाठी लोकप्रतिनिधी कितपत पाठपुरावा करणार हेही तितकेच महत्त्वाचे ठरणार आहे. यावेळी ज्ञानेश्वर पा.शिंदे, बालाजी पा शिंदे ,उध्दव बापुराव शिंदे, परसराम शिंदे.,माधव शिंदे,संजय शिंदे ,नागेश शिंदे ,बापुसाहेब शिंदे ,आनंदराव शिंदे ,गोविंदराव शिंदे ,भुजंग पेहलवान,.संदिप शिंदे ,शिवाजी शिंदे ,सुभाष शिंदे, भागवत शिंदे, राजु शिंदे ,डिगांबर शिंदे यांच्या सहसंख्य शेतकरी उपस्थित होते.

## नवी मुंबई जिल्हा किकबॉक्सिंग स्पर्धेत वॉरियर तायक्वांदो अकॅडमीची जोरदार चमक




**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.२६, ऐरोली (नवी मुंबई) :** प्रशिक्षक मंगेश औटी यांच्या मार्गदर्शनाखालील वॉरियर तायक्वांदो अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी नवी मुंबई जिल्हास्तरीय शालेय किकबॉक्सिंग स्पर्धा २०२५-२६ मध्ये उत्तुंग कामगिरी करत पदकांची लक्षणीय कमाई केली. ही स्पर्धा श्रिमती जानकीबाई कृष्णा मढवी मंगलकार्यालय, सेक्टर-५, ऐरोली येथे पार पडली.

अकॅडमीने एकूण ११ सुवर्ण, ५ रौप्य आणि ३ कांस्य पदके पटकावली असून १७ खेळाडूंनी सहभाग नोंदवला.

सुवर्णपदक विजेते...

भार्गव हुमणे, सुशांत शिंदे, समर्थ मोते, नियती इंगळे, वेदांत कोर्डे, विश्वस पांडे, वृशाली पारुळेकर, हर्षिणी पांडे, मनहा झरिवाला, आराध्या गुरव, ईशा विश्वराव

रौप्यपदक विजेते...

आर्या राज, दिनेश बोगटी, शिवम चौरसिया, वेदांत इंगळे, सिया बाबाज

कांस्यपदक विजेते..

अनुष्का प्रसाद, हर्षल शिंदे, अतिक नदाफ

सहभाग...

अभिद्र्या शेनवी, मिहिका पाटील, हर्ष कानोजीया, यशराज पोते, आर्या धिवर, शौर्य इंदोरे, आयुष भूमकर, वेदांत पोयरकर, हिरल कोळी, कणिश्का सैनी, प्रिया सोरटे, श्रेया गुप्ता, शगुन दुबे, प्रिया यादव, अविनाश प्रसाद, विहान पाटील, समीक्षा गटकल

प्रशिक्षक मंगेश औटी यांनी विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आनंद व्यक्त केला आणि सांगितले की या स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो व ते राज्य व राष्ट्रीय स्तरावरील मोठ्या आव्हानांसाठी सज्ज होतात.

## सततच्या पावसाने शेतकऱ्यांचे स्वप्न उद्‌ध्वस्त; कापूस, सोयाबीनची नासाडी

**अक्षराज : कैलास राठोड**
**दि.२६, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्याच्या शेतकऱ्यांचे आयुष्य यंदा पुन्हा एकदा पावसाच्या पाण्यात वाहून गेलं आहे. मागील काही दिवसांपासून सतत चालू असलेल्या पावसामुळे कापसाच्या शेतातील बोंडं काळवंडून गळू लागली आहेत. तर सोयाबीन शेतात उभं असूनही गेल्यात जमा झाल्यासारखं दिसत आहे. शेतकऱ्यांनी हजारो रुपये खर्च करून उभारलेलं पीक काही दिवसांतच जमिनीवर कोसळलं.

आधीच वाढत्या खर्चाने, उत्पादनखर्चाच्या झळांनी हैराण झालेला बळीराजा आता पुन्हा एका मोठ्या संकटात सापडला आहे. दिवाळी सण काही दिवसांवर आला असला तरी शेतकरी कुटुंबांमध्ये मात्र हताशा आणि काळजीचे वातावरण आहे. दिवाळी कशी साजरी करायची? हा प्रश्न प्रत्येक शेतकऱ्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसतोय.पावसामुळे केवळ पिकांचंच नुकसान झालेलं नाही तर गुरेढोरांचाही जीव गेला आहे. तालुक्यातील अनेक ठिकाणी जनावरे पावसाच्या पाण्यात वाहून गेल्याच्या घटना घडल्या. मुक्या जित्राबांच्या मृत्यूमुळे शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा साथीदारही हिरावला गेला.मराठवाड्यासह विदर्भात कधी कोरडा दुष्काळ तर कधी ओला दुष्काळ अशा दुहेरी संकटांचा सामना बळीराजा वर्षानुवर्षे करीत आहे. पण यंदाचा पाऊस मात्र शेतकऱ्यांच्या तोंडचा घासच हिरावून नेणारा ठरला.उरले-सुरले पीक, आशा-आकांक्षा, स्वप्नेः सर्व काही पावसाच्या पाण्यात वाहून गेल्याने किनवट तालुक्यातील शेतकऱ्यांसमोर आता जगावं की मरावं, एवढाच प्रश्न उरला आहे.

## ताडोबा प्रवेश शुल्क स्थानिकांसाठी कमी न झाल्यास १ ऑक्टोबरपासून तीव्र आंदोलन

### खासदार प्रतिभा धानोरकर यांचा वनमंत्र्यांना थेट इशारा



**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि. २६ चंद्रपूर :** ताडोबा- अधारी व्याघ्र प्रकल्पाचे प्रवेश शुल्क सामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर असल्याने चंद्रपूर जिल्ह्याच्या नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

विशेषत: शनिवार- रविवारसाठी कोर झोनमधील तब्बल १२ हजार ६०० रुपये शुल्क स्थानिक लोकांसाठी असल्याने ताडोबा दर्शन केवळ एक ' स्वप्न' बनत आहे. याच पार्श्वभूमीवर, जिल्ह्याच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांनी वनमंत्री गणेश नाईक यांना कठोर भाषेत पत्र लिहून तातडीने शुल्क कपातीची मागणी केली आहे. अन्यथा १ ऑक्टोबरपासून तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मानव-वन्यजीव संघर्ष आहे. नागरीक वाघांच्या हल्ल्यांमुळे जीव गमावत असताना, त्याच जिल्ह्यातील लोकांना वाघाचे दर्शन घेण्यासाठी हजारो रुपये मोजावे लागत आहेंत, हा दुजाभाव त्वरित थांबवावा, अशी स्थानिकांची मागणी आहे. कोर झोनमध्ये सध्याचे प्रवेश शुल्क प्रति जिप्सी सोमवार- शुक्रवार ८ हजार ६०० रुपये, शनिवार-रविवार १२ हजार ६०० रुपये, तर बफर झोनमध्ये सोमवार-शुक्रवार ७ हजार ३०० रुपये, शनिवार-रविवार १० हजार ३०० रुपये याप्रमाणे आहे. स्थानिक नागरिकांना ताडोबा येथे जाण्यासाठी केवळ २ हजार ७०० रिपये वाहन शुल्क व ६०० रुपये प्रति व्यक्ती शुल्क आकारले जावे.

ताडोबामुळे चंद्रपूरची ओळख आहे. पण आज ताडोबा येथील लोकांनाच परका झाला आहे. हा अन्याय आम्ही कदापि सहन करणार नाही. जर १ ऑक्टोबरपासून सुरु होणाऱ्या नवीन पर्यटन हंगामापूर्वी स्थानिक नागरिकांसाठी शुल्क कपातीचा निर्णय लागू झाला नाही, तर १ ऑक्टोबर ला ताडोबात एकही जिप्सी आत जाऊ दिली जाणार नाही, असा इशारा खासदार प्रतिभा धानोरकर यांनी दिला आहे.

# महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेच्या निवडणुकीत तायक्कांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र नावावर आक्षेप

## राज्य संघटनेने नोटीस बजावून दर्शविला विरोध...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२६, मुंबई :** महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेच्या होऊ घातलेल्या निवडणुकीत पात्र सदस्यांच्या यादीपैकी तायक्कांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र संघटनेच्या नावावर अधिकृत महाराष्ट्र संघटनेने आक्षेप घेतला आहे.तायक्कांदो मध्ये दोन संघटना कार्यरत असतील आणि त्यांच्यात वादविवाद तसेच कोर्ट केस सुरू असेल तर,त्यापैकी एकाच संघटनेला मतदानाचा अधिकार कसा काय दिला जाऊ शकतो,असा प्रश्न उपस्थित करून न्याय न मिळाल्यास त्याविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा,तायक्कांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई संघटनेचे महासचिव शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते मिलिंद पठारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेतर्फे अलीकडेच एक परिपत्रक जारी करण्यात आले आहे.त्यात येत्या २ नोव्हेंबरला महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेची निवडणूक घेण्याचा निर्णय झाला आहे.मतदान प्रक्रियेसाठी पात्र राज्यांतील २२ अधिकृत क्रीडा संघटनांची प्राथमिक यादी प्रकाशित करण्यात आली आहे.या यादीत राज्यात तायक्कांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र या नावाने कार्यरत असलेल्या दोन संघटनांमध्ये गेल्या काही वर्षांपासून वाद सुरू आहे.दोन्ही संघटनांच्या स्वतंत्र निवडणुका झाल्या असून दोन्ही संघटना देशपातळीवर दोन वेगवेगळ्या फेडरेशनला संलग्न आहेत.न्यास नोंदणी व न्यायालयातही वाद सुरू आहे.असे दोन संघटनांमध्ये वाद सुरू असताना तायक्कांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र नावाचा समावेश मतदानासाठी पात्र संघटनांच्या यादीमध्ये समावेश आहे,मात्र या नावावर तायक्कांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र, मुंबई संघटनेला आक्षेप आहे.महासचिव मिलिंद पठारे यांच्या मते, घटनेतील तरतुदीनुसार तायक्कांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र मुंबई ही संघटना केवळ तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडियालाच संलग्न असू शकते व ती संलग्नता आमच्याकडे आहे.

ऑलिंपिक संघटनेवर पुढचे पाऊल अवलंबून

या प्रकरणी आम्ही महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनला कायदेशीर नोटीस बजावली आहे. आम्ही दिलेल्या आक्षेपावर ऑलिंपिक संघटना काय निर्णय घेते,यावर आमचे पुढचे पाऊल अवलंबून असणार आहे.यासंदर्भात न्यायालयाचे दार ठोठावण्याचा पर्याय आमच्याकडे उपलब्ध असल्याचे मिलिंद पठारे या वेळी म्हणाले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार इंडिया तायक्कांदो विरूद्ध आमची न्यास नोंदणी कार्यालय मुंबई येथे केस सुरू आहे.असे असताना महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचा मनमानी कारभार एकाला एक व दुसऱ्या बाजूला दुसराच नियम सोईस्कर पद्धतीने लावून मनमानी कारभार सुरू आहे. शिवाय,तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडियाने आम्हाला मान्यता दिलेली आहे.त्यामुळे दुसऱ्या समांतर संघटनेला आगामी निवडणुकीत मतदानाचा अधिकार देऊ नये,अशी आमची मागणी आहे. महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेच्या परिपत्रकाप्रमाणे याविषयी आम्ही निर्धारित तारखेच्या आत (२३ सप्टेंबर) आपला आक्षेप नोंदविला आहे.

मिलिंद पठारे म्हणाले,राज्यातील इतरही अनेक क्रीडा संघटनांमध्ये वाद सुरू असून,न्यायालयात खटले चालू आहेत. प्रकरण न्यायप्रविष्ट असताना दोनपैकी एका संघटनेला मतदानाचा अधिकार देणे पूर्णपणे चुकीचे आहे.एकतर दोन्ही संघटनांना मतदानाचा अधिकार द्यावा किंवा कुणालाच देऊ नये.सर्वांसाठी सारखा नियम असायला पाहिजे.

मान्यता तत्काळ रद्द करावी.

संघटना राज्य ऑलिंपिक संघटनेची मान्यताप्राप्त कशी असू शकते ? राज्यातील अधिकृत राज्य संघटनेसंबंधात कोर्टात वाद सुरू असल्याने येणाऱ्या महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेच्या निवडणुकीत तायक्कांदो असोशिएशन ऑफ महाराष्ट्र या नावे संस्थेला सहभागी करून घेणे, तसेच या संस्थेला ऑलिंपिक संघटनेची मान्यता मिळणे,यावर आमचा प्रामुख्याने आक्षेप

# थोडक्यात

## अगस्त्य इंटरनॅशनल फाउंडेशन आयोजित तालुकास्तरीय शिक्षक प्रशिक्षण संपन्न



**अक्षराज : गणेश गायकर**

**दि.२६, शहापूर (ठाणे) :** दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजी जिल्हा परिषद केंद्रशाळा धसई या ठिकाणी अगस्त्या इंटरनॅशनल फाउंडेशन,शहापूर टीम च्या वतीने तालुकास्तरीय शिक्षक प्रशिक्षण आयोजित आले .सदर प्रशिक्षणामध्ये २५ शिक्षकांनी आपली उपस्थिती नोंदवली.या प्रशिक्षणात सी सी इ उपक्रमाचे सीईओ- कोऑर्डीनेटर श्री.रोहन म्हात्रे सर यांच्या मार्फत सी सी इ उपक्रमातील विविध नाविन्यपूर्ण अँक्टिव्हिटी घेण्यात आल्या , तसेच ए.व्ही.आए.एस प्रोग्राम कोऑर्डीनेटर श्री.सुमित सर यांच्या वतीने अगस्त्या व्हर्च्युअल स्कूल मध्ये १९ शाळा ऑनबोर्ड केल्या गेल्या. त्याच प्रमाणे सर्कल कॅटीलायझर पल्लवी मॅडम व शहापूर टीमच्या वतीने काही लो कॉस्ट मॉडेल , सायंटिफिक ऍक्टिव्हिटी , पेपट्रॉनिक ऍक्टिव्हिटी आणि केमिकॅल ऍक्टिव्हिटी घेण्यात आल्या. उपस्थित सर्व शिक्षकांनी विविध कृतींमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेऊन आपल्यातील सर्जनशीलतेचे दर्शन घडविले. प्रशिक्षणाच्या आयोजनात पंचायत समिती शहापूरचे गटशिक्षणाधिकारी सन्मा.श्री. रामचंद्र विशे साहेब तसेच केंद्रशाळा धसईचे मुख्याध्यापक श्री. भास्कर वेखंडे सर आणि शिक्षकवृंद धसई यांनी प्रशिक्षणाच्या आयोजनात बहुमोल सहकार्य केले. प्रशिक्षणाच्या शेवटी सर्व शिक्षकांना प्रमाणपत्र देऊन आजच्या प्रशिक्षण सत्राची सांगता करण्यात आली.

# पुराने बाधित ४० गावातील नागरिकांचे जनजीवन सुरळीत करण्यासाठी प्रयत्न करावेत - पालकमंत्री गोरे

- पुराने बाधित चाळीस गावातील नुकसान झालेल्या सर्व घरांचे तातडीने याद्या तयार कराव्यात
- पाणीपुरवठा विभागाने बाधित गावांना टँकरद्वारे पिण्याचे स्वच्छ पाण्याचा पुरवठा करावा
- आरोग्य विभागाने सर्व बाधित गावात आरोग्य शिबिरांचे आयोजन करून सर्व नागरिकांच्या आरोग्याची तपासणी करावी




**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.२६, सोलापूर :** जिल्ह्यात मागील काही दिवसापासून अतिवृष्टी तसेच नद्यांना आलेल्या महापुरामुळे जवळपास ७९२ गावांना फटका बसला असून त्यातील ४०गावांमध्ये पुराचे पाणी शिरलेले होते. या ४० गावातील हजारो लोकांना निवारा केंद्रामध्ये ठेवण्यात आलेले आहे. तरी या ४० बाधित गावांचे व तेथील नागरिकांचे जनजीवन पूर्वीप्रमाणे सुरळीत होण्यासाठी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी अत्यंत जबाबदारी पूर्वक काम करावे, असे आवाहन राज्याचे ग्रामविकास व पंचायत राजमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात अतिवृष्टी व पूर परिस्थितीच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत पालकमंत्री. गोरे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिका आयुक्त सचिन ओंबासे, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अप्पर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांच्यासह सर्व संबंधित विभाग प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री. गोरे पुढे म्हणाले की, सध्या बाधित गावातील नागरिक निवारा केंद्रामध्ये राहत आहेत, परंतु आत्ता गावातील पुराचे पाणी कमी होत असून सर्व स्थानिक प्रशासनाने तसेच जिल्हास्तरीय प्रशासनाने बाधित असलेले सर्व ४० गावांचे व तेथील नागरिकांचे जनजीवन सुरळीत होऊन मुख्य प्रवाहात येण्यासाठी सर्व तातडीच्या उपायोजना राबवाव्यात. आरोग्य विभागाने सर्व नागरिकांच्या आरोग्याच्या तपासणीसाठी आरोग्य शिबारे आयोजित करावीत. पाणीपुरवठा विभागाने त्या गावातील नागरिकांना तेवढा पिण्याचा पाण्याचा पुरवठा टँकरद्वारे करावा. तसेच संपूर्ण पाणी कमी झाल्यानंतर पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करावी. सर्व ग्रामस्तरीय संबंधित विभागांनी एकत्रित येऊन सर्वप्रथम गावाची स्वच्छता करून घ्यावी. व साथीच्या रोगाचा प्रसार होणार नाही याचीही काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले.

जिल्ह्यातील व जिल्हा बाहेरून मागवण्यात आलेल्या एकूण दहा बचाव पथकामार्फत पूर कालावधीत ४ हजार ३५० नागरिकांना सुखरूप बाहेर काढून निवारा केंद्रामध्ये ठेवण्यात आले. अशा ७६ निवारा केंद्र मधून स्थलांतरित केलेल्या या सर्व नागरिकांना प्रशासनाने जेवण, पाणी, आरोग्य सुविधा व अन्य अनुषंगिक बाबी उपलब्ध करून द्याव्यात. यात कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे निर्देश पालकमंत्री गोरे यांनी दिले. तसेच प्रशासनाने अतिवृष्टी व पूर परिस्थितीमध्ये खूप चांगले काम केलेले असून या सर्व नागरिकांना सुखरूप बाहेर काढल्याबद्दल त्यांनी कौतुक केले.

बाधित झालेल्या ४० गावांमध्ये किती घरांचे शंभर टक्के नुकसान झालेले आहे व किती घरांचे अंशतः नुकसान झालेले आहे त्याच्या याद्या सर्व संबंधित तहसीलदार यांनी ग्रामस्तरीय यंत्रणेकडून तात्काळ तयार करून घ्याव्यात. तसेच या बाधित गावातील एकूण कुटुंबांची संख्या याचीही आकडेवारी तयार करावी. त्याप्रमाणेच बाधित गावातील जनावरांना चाऱ्याची उपलब्धता पशुसंवर्धन विभागाने तात्काळ होईल याबाबत कार्यवाही करावी, अशा सूचना गोरे यांनी दिल्या. त्याप्रमाणेच जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हा परिषदेचा सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडील किती रस्त्यांचे नुकसान झाले याची माहिती घेऊन ते प्राथमिक स्तरावर तात्काळ दुरुस्तीची कार्यवाही सुरू करावे. वीज वितरण कंपनीने या गावातील वीज पुरवठा तात्काळ सुरू करावा, असे त्यांनी निर्देशित केले.

प्रशासनाने अतिवृष्टी पुरामुळे झालेल्या सर्व नुकसानीचे अहवाल तयार करून तात्काळ सादर करावेत, असे सांगून पालकमंत्री गोरे यांनी माढा करमाळा उत्तर सोलापूर अक्कलकोट मोहोळ या तालुक्यांचा सविस्तर आढावा घेऊन मार्गदर्शक सूचना दिल्या. तसेच अनेक दानशूर व्यक्ती संस्था यांच्याकडून पूर बाधित नागरिकांसाठी प्रशासनाकडे मदत येत आहे. ती आलेली मदत सर्व संबंधित बाधित नागरिकापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी प्रशासनाने अत्यंत चौकपणे पार पाडावी. तसेच निवरा केंद्रामध्ये नागरिकांना जेवणाची व्यवस्था करणे प्रशासनाची जबाबदारी असून यात इतर कोणावरही अवलंबून राहू नये असेही त्यांनी निर्देशित केले.

प्रारंभी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेली गावे ७९२ असून त्यातील ४० गावांमध्ये पुराचे पाणी जाऊन घरांचे नागरिकांचे खूप मोठे नुकसान झाल्याचे सांगितले. तसेच या काळात ८ नागरिकांचे मृत्यू झालेले असून मयत जनावरांची संख्या १५६ तर मयत कोंबड्यांची संख्या १८००० इतकी आहे तर घरांची अंशता पडझड ८८३ इतकी झालेली असून बाधित शेतकऱ्यांची संख्या दोन लाख २३ हजार ६६१ बाधित शेती क्षेत्र एक लाख ९६ हजार ५६१ हेक्टर इतके असल्याचे त्यांनी सांगितले. तर ४४१७ घरामध्ये पाणी शिरल्याची माहिती देऊन सर्व पंचनामेची कार्यवाही लवकरच पूर्ण होईल असे सांगितले.

# भगवती व भक्ती दुर्गा मंडळाच्या ठिकाणी भक्तांना दररोज महाप्रसाद वितरण



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२६, कुंडलवाडी (नांदेड) :** शारदीय नवरात्रोत्सवाच्या काळात भगवती व भक्ती या मंडळाच्या ठिकाणी दररोज सायंकाळी ८ ते १० या वेळेत किमान २ हजार भाविकांना नि:शुल्क महाप्रसाद वितरित केला जातो. या कालावधीत जेवढे भाविक महाप्रसाद घेण्यास येतील त्या सर्वांना तो प्रदान केला जातो. कोणालाही उपाशी पाठवले जात नाही,अशी माहिती मंडळाच्या वतीने देण्यात आली. भाजी,पोळी,वरण,भात,एक गोड पदार्थ,असे या महाप्रसादाचे स्वरूप असते.अगदी घरीच जेवत आहोत,असे येथे जेवणाऱ्याला वाटते. जेवणात सात्त्विकता ठेवली जाते. त्यामुळे भाविकांना रुचकर व आरोग्यदायी महाप्रसाद अगदी सहज उपलब्ध होतो. यासाठी भाविकांची सायंकाळी ८ वाजतापासून लांबलचक रांग असते. स्वयंसेवकांद्वारे भाविकांना महाप्रसाद वाढला जातो. तसेच पिण्यासाठी शुद्ध पाण्याची व्यवस्था आहे. या ठिकाणी येणारे भाविकच नव्हे तर शहरातील भाविकही प्रसाद घेतात.महाप्रसाद तयार करण्यासाठी सकाळपासूनच आचारी, तसेच मंडळ कामाला लागतात. सुरुवातीला किमान एक हजार भाविकांसाठी महाप्रसाद तयार होतो. त्यानंतर गर्दी बघून लगेच महाप्रसाद तयार करणे सुरू होते. नवरात्रोत्सवातील ९ ही दिवस ही सोय भाविकांसाठी असते. भाविकांकडून मंडळाला दान केले जाणारे धान्य, तेल तसेच दानदात्यांकडून मिळणाऱ्या दानातून हा महाप्रसादाचा खर्च केला जातो. शहरात अनेक दानदाते हे धान्य, तेल, मसाले, भाजीपाला यांचे दान करत असतात. तसेच जे पदार्थ कमी पडतात त्याची खरेदी मंडळाद्वारे केली जाते.

# सततच्या पावसामुळे मुखेड तालुक्यातील शेतकरी पुन्हा संकटाच्या भोवऱ्यात

**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२५, मुखेड (नांदेड) :**

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद परिसरात संततधार कोसळणाऱ्या परतीच्या पावसामुळे मुक्रमाबादमधील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. खरीप हंगामातील सोयाबीन तूर, मूग ,उडीद, तीळ, ज्वारी , ऊस ,केळी व इतर पिकांसह जनावरे वाहून गेली, जवळपास सर्वच पिके पाण्यात बुडून गेल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. अनेकांच्या शेतात उभे पिके पूर्णतः उध्वस्त झाले. असून लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या सोबतच शेतकऱ्यांची घरे जनावरे मोटार पाईपलाईन गोठे इतर शेतीची साधने पाण्याने वाहून गेल्याने ग्रामीण भागात हाहाकार माजला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाकडून पंचनामे केली आहेत . प्रत्यक्षात पुराचे पाणी घरात शिरून अनेक घरे पडली, घरातील सर्व जीवनावश्यक साहित्य ज्वारी,दाळ,गहू,मुगदाळ, तुरदाळ, उडीददाळ, प्रत्यक्षात पुराच्या पाण्यात भिजून गेले. शेतकऱ्यांना आजपर्यंत शासनाची कवडीचीही मदत मिळाली नाही ?असे आरोप शेतकरी करीत आहेत. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामामुळे पंचनामे झाली असताना देखील शासनच वेळेवर मदत देत नाही. पंचनामे झाली नुकसानीचा योग्य मोबदला शासनाकडून दिला जात नाही. असे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानिचे योग्य मूल्यमापन करून मोबदला शासन जवळपास योग्य मोबदला शेतकऱ्यांना मिळत नाही असे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. शेतात उभ्या पिकांचे शंभर टक्के नुकसान झाले आहे. पण पंचनाम्यात किती टक्के नुकसान दाखविले हे कळत नाही. शेतकऱ्यांना शेतातील जमिनी खरडून गेल्या मुळे जमिनी पेरण्यायोग्य राहिलेल्या नाहीत .असे असताना देखील शासन त्यांना योग्य मोबदला दिला नाही. तर शेतकरी रब्बी हंगाम कशी करायची हे राक्षसी संकट शेतकऱ्यांकडे उभे आहे. ई- पिक पाहणी पासून अजून बरेच शेतकरी वंचित राहीले आहेत. शेकडो शेतकऱ्यांना ई-पीक पाहण्याचा फोटो देता आले नाही, तर काही शेतकऱ्यांच्या शेतामध्ये नेटवर्क नसल्यामुळे बरेच शेतकरी विम्यापासुन वंचित राहण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. पाऊस सर्वदुर पडला असल्यामुळे



नुकसानही सर्वच शेतकऱ्यांचे झाले आहे, कागदपत्रांचा खेळ कशासाठी खेळवला जात आहे. याबद्दल संतप्त प्रक्रिया शेतकऱ्यांमध्ये व्यक्त होत आहे शेतकऱ्यांचा प्रश्न आता फक्त पिकांच्या नुकसानी पुरता मर्यादित राहिलेला नाही तर जीवनावश्यक प्रश्न बनला आहे, बँकेचे हप्ते कसे फेडायचे, जनावरांना चारा कुठून आणायचा, मुलांच्या शिक्षणाचं कसे होईल मोडलेल्या संसाराचा गाडा कसा चालवायचा असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांसमोर आवासुन उभा आहे. सरकारकडून मदत केव्हा जाहीर होईल या संभ्रमात शेतकरी होते , मात्र प्रत्यक्षात शासकीय मदत जाहीर होताच शेतकऱ्यांमध्ये आक्रोशाची भावना निर्माण झाली आहे. तुटपुंज्या मदतीने काहीच होणार नाही. प्रत्येक शेतकऱ्यांच्या हाती भरीव अशी मदत शासनाकडून मिळावी हीच अपेक्षा परिसरातील शेतकरी करीत आहेत .